- // प्रेसनोट // - दिनांक :- १८ /०८/२०२४

## सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग, बी.के.सी., मुंबई

### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची (MHADA) बनावट वेबसाईट बनवुन म्हाडा प्राधिकरणाच्या अर्जदारांकडुन बनावट वेबपोर्टलव्द्ारे रक्कम स्वीकारून अर्जदारांची फसवणूक करणाऱ्या आरोपीतांना अटक केलेबाबत..

महाराष्ट्र शासनाच्या अंर्तगत येणाऱ्या महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) यांच्या https://housing.mhada.gov.in/ या अधिकृत वेबपोर्टलसारखे www.mhada.org हे बनावट वेबपोर्टल तयार करुन त्याद्वारे वर्ष २०२४ करीता सुरु असलेल्या सदनिकेच्या जाहिरीताच्या अनुषंगाने आगाउ रक्कम वरील बनावट वेबपोर्टलद्वारे स्विकारुन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) व म्हाडा प्राधिकरणाच्या अर्जदारांची फसवणुक केल्याबाबतचा तक्रार अर्ज प्राप्त झाल्यावरुन गु.र.क्र. २६९/२०२४ कलम ३१९(२), ३१८(४), ३३६(२), ३३८, ३३६(३),३४०(२), ६१ भारतीय न्याय संहिता सह कलम ६६-क, ६६-ड माहिती व तंत्रज्ञान कायदा अन्वये सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग, बीकेसी, मुंबई येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

नमूद गुन्हयाचा तांत्रिक व पारंपारिक पध्दतीने तपास करुन, पोलीस निरीक्षक बाळासाहेब कानवडे, सपोनि अमित उतेकर, पोलीस शिपाई/०९०८०७ तकिक, पोलिस शिपाई/१५१२५९/देसाई, पोलिस शिपाई/१८०२०६ जाधव यांनी गुन्हे शाखा युनिट ५ चे सपोनि माळी, सहा. फौजदार भुजबळ, पोलीस हवालदार /पाटील, गुन्हे शाखा युनिट ४ चे पोलीस उपनिरीक्षक भिसे व पथक तसेच गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस हवालदार अनुभुले, पोलीस हवालदार बिडवे यांच्या मदतीने **०२ आरोपीतांना अटक** करण्यात आली.

सदरची प्रभावी कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशीकुमार मिना, मा. पोलीस उप आयुक्त (सायबर गुन्हे) श्री. दत्ता नलावडे, मा.सहायक पोलीस आयुक्त ( सायबर विभाग) श्री. सोनावणे यांच्या मार्गदर्शानाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक (सायबर पोलीस ठाणे, पश्चिम विभाग ) दत्ताराम चव्हाण, पोलीस निरीक्षक बाळासाहेब कानवडे, सपोनि अमित उतेकर, पोलीस शिपाई/०९०८०७ तकिक, पोलीस शिपाई/१५१२५९/देसाई, पोलीस शिपाई/१८०२०६ जाधव तसेच गुन्हे शाखा युनिट ५ चे सपोनि माळी, सहा. फौजदार भुजबळ, पोलीस हवालदार /पाटील, गुन्हे शाखा युनिट ४ चे पोलीस उपनिरीक्षक भिसे व पथक तसेच गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस हवालदार अनुभुले, पोलीस हवालदार बिडवे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

**मुंबई पोलीसांच्या सायबर गुन्हे शाखेमार्फत जेष्ठनागरीक, जनसामान्य लोकांना विनंती आहे की, म्हाडाची घरे अधिकृत लॉटरीविना, ऑफलाईन / ओळखीने स्वस्तात मिळवून देतो अशा प्रकारे फसवणुक करणाऱ्या सायबर भामटयां पासुन सावध रहावे. मोबाईल, फोनवरील अनोळखी व्यक्तीला आपला बॅक अकाउंट नंबर, पासवर्ड, ओ.टी.पी., केवायसी, डेबीट कार्ड क्रमांक, आधारक क्रमांक, पॅनकार्ड क्रमांक अशी संवेदनशील माहिती मागत असतील तर नजिकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. अनोळखी व्यक्तींच्या सांगण्या वरून कोणतेही मोबाईल ॲपडाउन लोड करू नये तसेच लिंक क्लिक करू नये.**

**जर आपल्या सोबत सायबर संदर्भात गुन्हा घडल्यास तात्काळ सायबर हेल्प लाईन क्र. १९३० किंवा आपले नजिकच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.**

**# cybersafemumbai**
**Report Cyber Crime on Helpline 1930 OR https://cybercrime.gov.in**